# महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग

कर्मचारी कल्याण कक्ष, "E" बरॅक, कृषि आयुक्तालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, ससुन हॉस्पीटल समोर, पुणे - 411 001.
दूरध्वनी क्रमांक : [020] 26119163
Email ID: welfareagri@gmail.com

**वाचा :**

1. साप्रवि, शासन निर्णय क्रमांक एसआरव्हि /1095/प्र.क्र.1/95/12, दिनांक 8 जुन 1995
2. साप्रवि, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-1095/प्र.क्र.29/95/बारा, दिनांक 22 एप्रिल 1996
3. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक क्र.आकृवि 1298/प्र.क्र.61/15-ए, दिनांक 29 मे 1998
4. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन 1199/प्र.क्र.2/99/सेवा-3, दिनांक 20/07/2001
5. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन /2002/प्र.क्र.1/सेवा-3, दिनांक 11/01/2002
6. कृषि व पदुम विभाग पत्र क्र आकृवि/1202/प्र.क्र.471/15 ए, दिनांक 2 जुलै 2002
7. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3, दिनांक 1 एप्रिल 2010
8. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1109/प्र.क्र.41/सेवा-3, दिनांक 5 जूलै 2010
9. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3, दिनांक 1 जूलै 2011
10. साप्रवि परिपत्रक क्र. बीसीस-2012/प्र.क्र.332/12/16-ब, दिनांक 18 मे 2013.
11. साप्रवि शासन निर्णय क्रमांक वशिअ-1214/प्र.क्र.26/11, दिनांक 2 जून 2014
12. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक आप्रयो-1014/प्र.क्र.21/सेवा-3, दिनांक 6 सप्टेंबर 2014
13. वित्त विभाग शासन निर्णय क्र.आप्रयो/1015/प्र.क्र.111/2015/सेवा-3, दिनांक 23 डिसेंबर 2015
14. वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3, दिनांक 9 डिसेंबर 2016
15. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3, दिनांक 11 मे 2017
16. साप्रवि शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2015/प्र.क्र.310/कार्या-12, दिनांक 15/12/2017
17. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1119/प्र.क्र.3/2019/सेवा-3, दिनांक 02 मार्च 2019
18. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2019/प्र.क्र.27/कोषा-प्रशा-4, दिनांक 14 मे 2019
19. मा. आयुक्त (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 13/07/2020 रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त जा. क्र. कृआ/आस्था-6(कक)/सुसेआप्रयो/बैइवृ/16370/2020, दिनांक 13/07/2020

जा.क्र.कृआ/आस्था-6(कक)/सुसेआप्रयो/ १९८८४ /2020, दिनांक :२४/ 08 /2020

**विषय : <u>सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेंतर्गत लाभ मंजूर करणे बाबत . . .</u>**

## :: आदेश ::

उपरोक्त अ. क्रं. 3 व 6 नुसार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना खालील प्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेंतर्गत लाभ मंजूर करण्यात येत आहे.

[1] महाराष्ट्र कृषि सेवा गट ब या संवर्गात सन 1996-97 मध्ये सरळसेवेने नियुक्त झालेले अधिकारी यांना नियुक्तीपासून 12 वर्षानंतर महाराष्ट्र कृषि सेवा गट अ [कृषि उपसंचालक] या संवर्गाची वेतन श्रेणी पहिला लाभ म्हणून अनुज्ञेय झालेनंतर 8 वर्षाच्या सलग सेवेनंतर महाराष्ट्र कृषि सेवा गट अ [अधिक्षक कृषि

अधिकारी] या साखळी पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी एस-23 : 67700 - 208700 दुसरा लाभ रकाना क्रमांक 3 मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं. | अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व सद्याचे कार्यालय | लाभ देय दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | लक्ष्मण किसन खुरकुटे कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद अलिबाग | 18-Dec-2016 | |
| 2 | शंकर परशुराम काळे तालुका कृषि अधिकारी जिंतुर | 24-Dec-2016 | |
| 3 | मनाली मिलींद तांबडे तंत्र अधिकारी विभागीय कृषि सह संचालक ठाणे | 30-May-2018 | |

[2] महाराष्ट्र कृषि सेवा गट ब [कनिष्ठ] कृषि अधिकारी या संवर्गात सन 1996-97 मध्ये सरळसेवेने नियुक्त झालेले अधिकारी यांना नियुक्तीपासून 12 वर्षानंतर महाराष्ट्र कृषि सेवा गट ब या संवर्गाची वेतन श्रेणी पहिला लाभ म्हणून अनुज्ञेय झालेनंतर 8 वर्षाच्या सलग सेवेनंतर महाराष्ट्र कृषि सेवा गट अ [कृषि उप-संचालक] या साखळी पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी एस-20 : 56100-177500 या साखळी पदोन्नतीमधील वेतनश्रेणी दुसरा लाभ रकाना क्रमांक 3 मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं. | अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व सद्याचे कार्यालय | लाभ देय दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | संजय लक्ष्मण हिवाळे मोहिम अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद | 11-Dec-2017 | |

**अटी व शर्ती**

1. या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर वेतननिश्चिती नियमीत पदोन्नती प्रमाणेच होईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित / कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.
2. उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांनी वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पीएवाय-1082/सीआर-1100(एक)/एसईआर-3 दिनांक 06/11/1984 अन्वये वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीकरता हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विकल्प द्यावा. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांची लाभाच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून देण्यात यावा.
3. जर एखाद्या अधिकारी / कर्मचारी यांना विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखाली लाभ मिळाल्यानंतर त्यास मुळ वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.
4. या योजनेंतर्गत लाभ मिळाली तरी अधिकारी / कर्मचारी यांचे नाव कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीतच राहील.
5. या आदेशाने देण्यात आलेली साखळी पदोन्नती ही फक्त आर्थिक लाभापुरतीच मर्यादित असून नियमीत पदोन्नतीच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.
6. उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांची वेतन निश्चिती करताना सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्हि/1095/प्र.क्र.1/95/12, दिनांक 08/06/1995 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बंधपत्र लिहून देणे सक्तीचे आहे. त्याप्रमाणे संबधितांकडून बंधपत्र प्राप्त करुन घेऊन एक प्रत सेवापुस्तकात चिटकवावी.
7. प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या वा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.

8. उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींची [ मराठी / हिंदी भाषा उत्तीर्ण - सुट, विभागीय लेखा परिक्षा उत्तीर्ण - सुट, संगणक अर्हता, परिविक्षा कालावधी, स्थायी घोषीत, पहिला / दुसरा लाभ देय दिनांक, विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण सद्यस्थिती, मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांचे बाबतीत जात वैधता प्रमाणपत्र ] त्यांच्या मुळ सेवा पुस्तकावरुन पडताळणी करुनच पुढील वेतन निश्चिती करावी.
9. वरील निकष जे अधिकारी / कर्मचारी पुर्ण करीत नाहीत त्यांची वेतन निश्चिती न करता याबाबतचा सविस्तर अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करावा व वरील सर्व बाबींची पुर्तता होत नसतांनाही त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन निश्चित केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील.
10. सदर आदेश http://krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर संकेत स्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी

**स्वाक्षरीत/-**
**[धीरज कुमार]**
**आयुक्त कृषि**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रत - माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

1. मा. सचिव [कृषि], कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
2. मा. महालेखापाल, मुंबई / नागपूर.
3. कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे (सर्व संबंधित)
4. कृषि संचालक, महाराष्ट्र राज्य बिज प्रमाणीकरण यंत्रणा, अकोला.
5. विभागीय कृषि सह संचालक (सर्व संबंधित)
6. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व संबंधित)
7. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व संबंधित)
8. कोषागार / उपकोषागार अधिकारी (सर्व संबंधित)
9. सहाय्यक संचालक (लेखा-1) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
10. प्रशासन अधिकारी (सेवा पुस्तक) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
11. उप विभागीय कृषि अधिकारी (सर्व संबंधित)
12. जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी (सर्व संबंधित)
13. बिज परिक्षण प्रयोगशाळा (सर्व संबंधित)
14. खत चाचणी प्रयोगशाळा (सर्व संबंधित)
15. रासायनिक किटक चाचणी प्रयोगशाळा (सर्व संबंधित)
16. किटकनाशक उर्वरीत अंश तपासणी प्रयोगशाळा (सर्व संबंधित)
17. जैविक प्रयोगशाळा (सर्व संबंधित)
18. तालुका कृषि अधिकारी (सर्व संबंधित)
19. संबंधित कर्मचारी

**कृषि उप संचालक**
**कर्मचारी कल्याण**
**कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,**
**पुणे - 411 001**